सोमवार दि.८ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# मी १५ दिवसांत भाजपात प्रवेश करणार एकनाथ खडसेंनी स्वतः केला खुलासा

## माझा प्रवेश वरिष्ठांच्या उपस्थितीत दिल्लीत होणार–एकनाथ खडसे

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला रामराम ठोकून भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या एकनाथ खडसेंच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. कारण एकनाथ खडसे यांनी स्वत: माध्यमांशी बोलताना हा खुलासा केला. खडसे म्हणाले की, मी येत्या १५ दिवसांमध्ये भाजपमध्ये प्रवेश करणार असून वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत माझा प्रवेश सोहळा दिल्लीत होणार आहे. एकनाथ खडसे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार मी कायमच ऋषी राहिल. शरद पवारांनी आपल्याला संकट काळात मदत केली. त्यामुळे त्यांना विसरणे अशक्य आहे. परंतु मला माझ्या मुळ पक्षात असले पाहिजे, अशी साद अनेक ज्येष्ठ नेत्यांनी घातली होती. त्यानंतर मी विचार करून हा निर्णय घेतला आहे.एकनाथ खडसे यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीवारी केल्याची बातमी समोर आली होती. त्यानंतर त्यांनी आपले भाजपच्या पक्षश्रेष्ठींसोबत चांगले संबंध असल्याचं म्हटलं होतं. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या सातत्याने चर्चा सुरु होत्या. या चर्चानंतर आज अखेर एकनाथ खडसे यांनी या चर्चांवर स्पष्टीकरण केले.भाजपचे केंद्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची मी भेट घेतली. भाजपमध्ये प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार मी भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. येत्या १५ दिवसांच्या आत हा प्रवेश व्हावा, अशा स्वरुपाचा माझा प्रयत्न आहे. चंद्रपूरच्या सभेत वगैरे माझा भाजप प्रवेश नाही.



माझा भाजपप्रवेश हा दिल्लीला होणार आहे. दिल्लीला केंद्रीय नेतृत्वाकडून मला ज्यादिवशी बोलवणं येईल त्याच दिवशी माझा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडेल, अशी माहिती एकनाथ खडसे यांनी दिली.एकनाथ खडसे म्हणाले की, भाजपमध्ये येण्यासाठी माझा प्रयत्न कधीही नव्हता. पण भाजपमध्ये जुने कार्यकर्ते आणि नेत्यांशी चर्चा करत असताना तुम्ही पक्षात परत आले पाहिजे. तुम्ही परत आले तर बरं होईल, अशी चर्चा आमची आणि वरिष्ठांमध्ये नेहमी होत असे. हे काय आजचं नव्हतं. चार ते सहा महिन्यांपासून त्यांनी अशाप्रकारची इच्छा व्यक्त केली होती. तेव्हापासून चर्चा सुरु होती, असेही खडसे म्हणाले.भारतीय जनता पार्टीच्या जडणघडणीमध्ये माझे योगदान राहीलं आहे. गेले अनेक वर्ष मी या घरामध्ये राहिलो आहे. चाळीस–बेचाळीस वर्ष ज्या भाजपमध्ये मी राहिलो त्यामुळे माझा लगाव जाण्याचा होता. काही कारणासाठी माझी नाराजी झाली. त्यामुळे मी या पक्षातून बाहेर पडलो होतो. माझ्या नाराजीची तीव्रता कमी झाली म्हणून मी माझ्या पक्षात जाण्याचा पुन्हा विचार करतोय, असेही एकनाथ खडसे म्हणाले.एकनाथ खडसे म्हणाले की, माझ्या पक्षप्रवेशाने कोणाचीही नाराजी नाही मी सर्वांना घेऊन चालणारा आहे. माझ्याविषयी कोणाची नाराजी असेल तर मी ते दूर करण्याचा प्रयत्न करेन. माझी नाराजी कमी झाली. त्यामुळे मी हा निर्णय घेतला.एकनाथ खडसे म्हणाले की, मला तुरुंगात टाकण्याचा कुठलाही धाक माझ्या मनात नव्हता. मी जामीनावर आहे. त्यामुळे मला पर्मनंट जामीन मिळाला आहे. त्यामुळे केस चालत राहील आणि मला कोणी उठून जेलमध्ये टाकेल, अशी देखील परिस्थिती आज तरी नाही. मी या संदर्भात निश्चित आहे, असे एकनाथ खडसे म्हणाले.

## पती–पत्नीचा उपक्रम जवळ जवळ १० ते ११ वर्षा पासून स्वखर्चाने वृक्षांची लागवड करून मोफत वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क

दानापूर । राम शिंदे




भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील वृक्ष प्रेमी रमेश कनगरे आणि विमलबाई कनगरे रमेश कनगरे हे ग्रामपंचायत कार्यालयाचे सफाई कामगार असून सुद्धा त्यांनी स्वतः नळ कनेक्शन घेऊन वृक्षांचे पालन पोषण केलेले आहे कोणाच रुपया न घेता आपल्या कष्ट मधून दहा ते अकरा वर्षापासून पती–पत्नी यांनी आपल्या घराजवळ रोपवाटिका तयार करून तिथे दरवर्षी वृक्षांची लागवड करतात लागवडी योग्य झाली की ती मोफत स्वरूपात वाटप करतात यावर्षी आंबा १८००, चिंच १०००, जांभूळ ६००, लिंब ५००, बेल १५०, अशा वृक्षांची लागवड केलेली आहे जूनमध्ये पाऊस पडला या झाडांची मोफत स्वरूपामध्ये वाटप करतात यंदा अति अल्प पावसामुळे वृक्षांवर दुपटीने खर्च झालेला आहे १४ते १५ टँकर विकत आणून वृक्षांना जगवण्याचे काम वृक्षप्रेमी रमेश कनगरे यांनी केले आहे शासनाचा रुपया न घेता स्वतःच्या पैशांमधून दहा ते अकरा वर्षापासून वृक्षांची जोपासना करून मोफत स्वरूपात वाटप करतात.

## शासनाचा नाकर्तेपणा, निराधारावर पाडव्या ऐवजी शिमगा साजरा करण्याची वेळ–कॉ.महादेव नागरगोजे

लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

गेल्या डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च या चार महिन्यापासून पाटोदा तालुक्यातील संजय गांधी, श्रावणबाळ, विधवा महिला परीतक्त्या यांचे मानधन शासनाच्या नाकर्तेपणामुळे मिळालेले नाही. गुढी पाडवा, रमजान ईद व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आबेडकर जयंती इत्यादीवर उत्सव आनंदाने साजरे करण्या ऐवजी शासनाच्या नाकर्तेपणामुळे गुढी पाडवा, रमजान ईद भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी गरीब, निराधार, दलित यांना उत्सवात साजरा करण्या ऐवजी शिमगा साजरा करण्याची वेळ आली आहे. पाडवा सण ९ एप्रिल, रमजान ईद ११ एप्रिल



तर १४ एप्रिल भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होणार आहे. हे अति महत्वाचे उत्सव असून मोदी शासनाचे नाकर्तेपणा व कर्मचारी, आधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे. तसेच मुळातच तहसिलचे कर्मचारी टेबलवर हजर राहत नसल्याने खेड्यातील गोरगरीब, निराधार, श्रावणबाळ, विधवा महिला, परितक्त्या खेड्यापाड्यातून येणारे वृद्ध आधंळे, पागळे, वृद्धपणामुळे व आजाराने जर्जर झालेले लाभधारक यांची शासकिय कर्मचारी व अधिकाऱ्यांनी क्रुर अशा प्रकारची हेळसाळ चालवली असून त्यांच्या वर पाडव्या ऐवजी शिमगा साजरा करण्याची वेळ आली आहे. येत्या पाडव्याच्या अगोदर लाभधारकाचे मानधन त्यांच्या खात्यावर जमा न केल्यास तहसील कार्यालयाच्या दारात शिमगा साजरा करण्या शिवाय पर्याय राहिला नाही. असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे भारतीय कम्युनिस्ट व किसान सभेचे नेते कॉ.महादेव नागरगोजे यांनी दिला आहे.

## चंद्रपूर, गडचिरोली मध्ये गारपीटीची शक्यता

लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे (वृत्तसंस्था)

राज्यात उन्हाचा चटका असह्य होत असतानाच वादळी पावसाला पोषक हवामान झाले आहे. आज विदर्भ, मराठवाड्यात गारपीटीची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यामध्ये प्रामुख्याने चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये गारपीटीचा अंदाज आहे. तर धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिकसह अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही आज पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे.

## कोल्हापुर येथे डॉ.अभिषेक खराडे पाटील यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले

लोकनेता न्यूज नेटवर्क

रमेश देशपांडे । मंठा

मंठा येथील दैनिक सेवाशक्ती टाइम्स मराठी चे प्रतिनिधी श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील यांना एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये अभिषेक रमेशराव खराडे यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे संयोजन कमिटी यांच्याकडून पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले असून दिनांक ७ एप्रिल रोजी कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला आहे. यशवंत यशा हून उत्तम कोणतीही गोष्ट नाही आणि आपले कौतुक करण्यासाठी याहून चांगली संधी नाही.



श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील राहणार मंठा आपण पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या लेखणीतून परखड लिखाण करून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.

तसेच लेखणीतून अनेकांना न्याय देण्याचं अतिशय चांगले काम केलंय खरोखरच कौतुकास्पद आहे आपल्या कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. याची दखल घेऊन एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्याला आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करीत आहोत. खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा असे जिल्हाधिकारी यांनी शब्दांनी गौरविण्यात आले आहे या पुरस्कार सोहळ्याचे महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा ,आंध्र प्रदेश ,मध्य प्रदेश, दिल्ली येथील विविध क्षेत्रातील गुणवंतांना पुरस्कार देण्यात आला आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर सर्व मित्र तसेच पत्रकार कडून हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## चालकांचा ताबा सुटल्याने भीषण अपघात ;सुदैवाने जीवित हानी टळली

### काळ आला होता पण वेळ आली नव्हती



लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

कंधार तालुक्यातील दिग्रस खुर्द गावाजवळ वळणदार रस्त्यांवर तुरीचा भुसा पशुखाद्य भरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वरून आर.जे.११जी.बी २१५५ ट्रक जळकोट कडून नांदेड कडे जात असताना दिग्रस ( खुर्द ) गावाजवळ ट्रक चालकांचा वाहनावरील ताबा सुटून वळनदार रस्त्यांच्या कडेला धडकून भीषण अपघात झाला आहे.

यापुर्वीही याचं वळणावर दहा ते पंधरा वाहणाचे अपघात होऊन जीवंत व प्रचंड वित्त हानी झाली, असून सुद्धा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास जाग आली नाही,कधी येणार जाग ? सार्वजनिक बांधकाम विभाग अजून सतत दोन शतक अपघात होण्याची वाट बघतेय की काय असा प्रश्न जनतेला पडला आहे. येथील गावकऱ्यांना या राष्ट्रीय महामार्गावर चालतांना जीव धोक्यात घालून चालावे लागत आहे.

कोण कसा भरधाव वेगात येईल यांचा नेम नाही,कधी कोणाचा अपघात होईल याची खात्री नाही,या वेळीप्रसंगी संभाजीराव केंद्रे महाविद्यालयाचे प्राध्यापक कंधारकडे तर काही नांदेड कडे जाताना

**ट्रक चालक प्रकाश जाधव वय वर्षे ३७ क्लीनर बिरबर यादव वय वर्षे ४७ रा.धुम मध्यप्रदेश येथील असून,अक्षरशः गाडी पलटी झाली असताना दोघेही मध्ये अडकले होते.प्रचंड रकतस्राव होत होता.या गंभीर प्रसंगी रॉड पत्रा तोडून दोघांनाही सुखरूप बाहेर काढण्यात आले. यावेळी तात्काळ मदतकार्यासाठी सर्वांनी जमेल तसे काम करून दोघांनाही बाहेर काढल्याबदल संभाजीराव केंद्रे महाविद्यालयांचे प्राध्यापकांचे गावकऱ्यांनी कौतूक केले.**

आमच्या डोळ्या देखत ट्रक धडकली घटनास्थळी पोहचून तात्काळ विनाविलंब बचाव कार्याला सुरूवात केली.

या गंभीर प्रसंगी यावेळी प्रा.डॉ तातेराव केंद्रे प्रा डॉ.नामदेव राठोड,उपप्राचार्य डॉ.व्यंकटराव पाटील,डॉ.मुंडकर संजय,प्रा डॉ बालाजी राठोड आदींसह गावकरी घटनास्थळी येऊन अपघातग्रस्त ट्रक चालक व त्यांच्या साथीदारांना दरवाजा तोडून पत्रा कापून बाहेर सुखरूप काढण्यात आले,यावेळी तात्काळ १०८ या दुरध्वनी क्रमांकावर फोन करून पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय कंधार येथे पाठविण्यात आले.

## मनसे च्या गुढीपाडवा मेळावा उपस्थित राहा

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत



शिवतीर्थ येथे मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली गुढीपाडवा मेळावा ९ एप्रिल रोजी शिवतीर्थ शिवाजी पार्क दादर मुंबई येथे संपन्न होत आहे. मराठी नवीन वर्षाच्या मुहूर्त राजसाहेब ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी तसेच बुलढाणा जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी सेना पद अधिकारी कार्यकर्ते महाराष्ट्र सैनिक यांनी सभेला उपस्थित राहावे असे आवाहन मनसे चे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शिवादादा पुरंदरे यांनी केले आहे.

## चारोळी

**दुसऱ्याच्या जगण्याच्या
आपण का अर्थ शोधत बसावा
स्वतःच जगणंच मस्त असावं
सुंदर आकार त्यात गिरवावा.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा

लोकनेता न्यूज नेटवर्क

ओतूर । मयूर ढोबळे



जिल्हा शिक्षण मंडळाच्या, अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण व विद्यार्थी गुणगौरव समारंभमोठ्या आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाला. अशी माहिती प्राचार्य महेंद्र अवघडे व प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ.वसंत गावडे यांनी दिली. सदर पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये शैक्षणिकक्षेत्र, क्रीडा क्षेत्रात, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व विद्यार्थी विकास मंडळ या विविध क्षेत्रांमध्ये विशेष प्राविण्य संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे राष्ट्रीय खेळाडू डॉ. विक्रम फाले मनोगतात म्हणाले,कोणत्याही क्षेत्रात गुरू शिवाय माणसांची जडण घडण होत नाही. आपल्याकडील ऊर्जेचा विधायक वापर करा.शिवव्याख्याते मा.प्रा.एस.झेड. देशमुख मनोगतात म्हणाले,आजच्या विद्यार्थ्यांनी चांगले वाचले व श्रवण केले पाहिजे.जे जे उत्कृष्ठ आहे.ते ते शोधले पाहिजे.देव,देश व धर्मावर प्रेम करा.महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा.अनिल तांबे, मा.राजेंद्र डुंबरे,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.के.एल.बनसोडे , उपप्राचार्य डॉ.के.डी. सोनावणे, उपप्राचार्य डॉ.रमेश शिरसाट, एन.एस. एस.प्रमुख डॉ.ए.एम. बिबे, सांस्कृतिक विभागाचे डॉ.ए.के.लोंढे , क्रीडा व शा. शि. संचालक डॉ.यू.पी.पनेरू,विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. एस.एस.लंगडे,एन.सी.सी.प्रमुख डॉ. निलेश हांडे, मा.भानुविलास गाढवे, मा भरतशेठ डुंबरे, मा शंकर पोळ आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विनायक कुंडलिक व डॉ.अजय कवाडे तसेच आभार डॉ. कल्याण सोनावणे यांनी मानले.

संपादकीय

# महती शांत स्वराची!

लोकनेता न्यूज नेटवर्क

देशाच्या आर्थिक क्षेत्रातील मूलगामी परिवर्तनाची पायाभरणी डॉ. मनमोहन सिंग यांनी केली.

सार्वजनिक जीवनात जितका मोठा आवाज, तेवढा प्रभाव जास्त, अशी अनेकांची समजूत असते. निवडणुकीच्या रणधुमाळीत तर हे प्रकरण एवढे टिपेला पोचते, की कर्कशता हाच जणू नियम वाटावा. त्यामुळे एकूणच राजकारणाच्या कोलाहलात शांत, संयत स्वराला काही स्थान आहे की नाही, असा प्रश्न कुणालाही पडेल. डॉ. मनमोहन सिंग यांची राजकारणातली कारकीर्द हे मात्र शांत स्वराचे, संयत शैलीचे एक लखलखीत उदाहरण आहे.डॉ. सिंग यांची राज्यसभेतील मुदत नुकतीच संपल्याने या बुजुर्ग, विद्वान नेत्याची सक्रिय राजकारणातील दीर्घ खेळी आटोपली आहे. डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव घेताच पहिली ओळख डोळ्यासमोर येते, ती म्हणजे आर्थिक उदारीकरणाचे प्रणेते हीच. तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी त्यांना आवश्यक ते राजकीय पाठबळ पुरवले, यात शंका नाही.परंतु आर्थिक पुनर्रचना पर्वाची सुरुवात ज्यांच्या अर्थसंकल्पाने झाली, त्या डॉ. सिंग यांचे श्रेय वादातीत आहे. ते अनुभवसंपन्न अर्थतज्ज्ञ आणि प्रशासक होतेच, पण परकी वित्तसंस्थांशी असलेले त्यांचे संबंध लक्षात घेऊन त्यांच्याकडे अर्थमंत्रिपदाची धुरा सोपविण्यात आली होती. श्रेयासाठी आटापिटा करण्याचा डॉ. सिंग यांचा स्वभाव नाही. हा ऐतिहासिक अर्थसंकल्प सादर करतानाही आपण कर्तेधर्ते असल्याचा आव त्यांनी आणला नाही.‘ज्याला पूरक असा काळ आलेला असतो, अशा विचारप्रवाहाला रोखणे पृथ्वीतलावरील कोणत्याही शक्तीला शक्य नसते,’’ हे फ्रेंच साहित्यिक व्हिक्टर ह्युगो यांचे विधान उद्धृत करून त्यांनी हा बदल कसा अटळ आहे, याकडे जनतेचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या विषयावर हळूहळू राजकीय सहमती तयार झाली. पण सुरुवातीच्या काळात बदलांना हात घालताना त्यांनी जो आत्मविश्वास दाखवला, त्याचे मोल वेगळे आहे.अर्थव्यवस्थेला जखडून ठेवणारे ‘लायसन्स-परमिट राज’चे साखळदंड मोडून काढताना आर्थिक पुनर्रचना पर्वाची पायाभरणी नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी केली. पुढे २००४ ते २०१४ या काळात पंतप्रधानपद भूषवितानाही सुधारणांचा मार्ग त्यांनी सोडला नाही.या काळात त्यांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), शिक्षण हक्क कायदा, आर्थिक लाभाचे थेट हस्तांतर, ‘आधार’ अशा योजना यशस्वीपणे राबविल्या. ‘मनरेगा’चा उपयोग पुढे ‘कोविड’च्या काळातही खूपच झाला. केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतरही सुधारणांच्या वाटचालीची दिशा बदलली गेली नाही.राजकारणात सुसंस्कृततेला काही स्थान असते का, असा प्रश्न अनेकदा उपस्थित होत असतो. पण त्याचा वस्तुपाठ डॉ. सिंग यांनी घालून दिला. २०१४ च्या निवडणुकीपूर्वी ‘‘नरेंद्र मोदी पंतप्रधान होणे, हे देशावरील महासंकट ठरेल,’’ असे उद्गार त्यांनी काढले होते. पुढे २०१८मध्ये मध्य प्रदेशात बोलताना त्यांनी त्या विधानाबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याचा मनाचा मोठेपणाही दाखवला.अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची योग्यता मोठी होतीच. पण त्यांचे वैशिष्ट्य असे की आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित सर्व महत्त्वाची पदे भूषवल्याचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, अर्थसचिव, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार अशा सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्याने या अनुभवसंपन्नतेचा फायदा देशाला नक्कीच झाला.नव्वदीनंतरच्या दशकात आणि त्यानंतरही एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी मध्यमवर्गाचा विस्तार झाला, त्यांच्या आकांक्षांना धुमारे फुटले, उद्योजकीय कर्तृत्वाला वाव मिळू लागला. या सगळ्यांत डॉ. सिंग यांच्या कारकीर्दीचा वाटा लक्षणीय आहे. अर्थात अर्थकारणाचा रथ हाकताना राजकीय उंचवटे आणि खाचखळगे यांना तोंड द्यावे लागतेच.डॉ. सिंग त्याला अपवाद नव्हते. पंतप्रधान या नात्याने ते कारभारी होते, पण राजकीय नेतृत्व सोनिया गांधींच्या हातात होते. या विभागणीचे काही फटके त्यांना सहन करावे लागले. पण ते शांत राहिले. राजकीय मुरब्बीपणात आपण कमी नाही, हे त्यांनी दाखवून दिले, ते अमेरिकेबरोबर नागरी अणुऊर्जा करार करताना. या मुद्यावर डाव्यांनी पाठिंबा काढून घेतल्यानंतरही सरकार टिकविण्याची करामत त्यांनी करून दाखवली होती.मात्र ‘यूपीए’ सरकारच्या दुसऱ्या काळात त्यांच्या सहकारी मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. मित्रपक्ष सरकारला नाचवत आहेत, असे चित्र निर्माण झाले. अशावेळी नेत्याला खंबीरपणे उभे राहावे लागते. डॉ. सिंग त्यात कमी पडले. तरीही राजकीय क्षेत्रातील त्यांच्या एकूण कामगिरीचे मोल कमी होत नाही. नियोजन मंडळातील तत्कालीन सचिव सी. जी. सोमय्या यांनी ‘द ऑनेस्ट ऑलवेज स्टँड अलोन’ हे पुस्तक लिहिले असून त्यातील एक प्रसंग मननीय आहे.राजीव गांधी पंतप्रधान असताना डॉ. सिंग नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष होते. पंचवार्षिक योजनेच्या तयारीसाठी आयोगाच्या सदस्यांनी जे सादरीकरण केले, त्यात ग्रामीण वास्तव, पाणीपुरवठ्याचे प्रश्न, शेतीतील दुखणी यांची आकडेवारी व माहिती होती. विकासविषयक कल्पना अगदी वेगळ्या असल्याने राजीव गांधींनी आयोगाच्या सदस्यांचा एका पत्रपरिषदेत ‘बंच ऑफ जोकर्स’ असा उपहासाने उल्लेख केला.या विधानाने नाराज झालेल्या डॉ. सिंग यांनी तत्काळ राजीनामा देण्याचा मनोदय बोलून दाखवला. तेव्हा ‘राजीव गांधी यांचे राजकारणातील नवखेपण, पाश्चात्त्य विकास प्रारूपाचा त्यांच्यावरील प्रभाव यांमुळे असे घडले आहे, परंतु राजीनामा देण्यापेक्षा याच ग्रामीण वास्तवाची जाणीव त्यांना करून देत राहाणे आवश्यक आहे,’ असा सल्ला सोमय्या यांनी दिला. तो सिंग यांनी मानला आणि तंतोतंत अंमलात आणला.ही प्रगल्भता, संयम आणि अधिकाऱ्याचा सल्ला ऐकण्याचे मोठेपण डॉ. सिंग यांच्या वर्तनातून दिसले. धोरणात्मक समतोलही साधला गेला. अशा सातत्यपूर्ण आणि पडद्याआडच्या कामांना झगमगाटी वलय नसते. पण इतिहास त्याची नोंद घेण्याइतका ‘उदार’ नक्कीच असतो.

# सुखाचे छोटे क्षण

लोकनेता न्यूज नेटवर्क

आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे की, जीवन हे क्षणभंगुर आहे आणि उद्याचा भरवसा नाही; पण तरीही प्रत्येक जण क्षणाचा आनंद न घेता जणू काही आपण इथे कायम राहणार आहोत, ह्या भ्रामक कल्पनेमध्ये सर्व मिळविण्याच्या नादात आपण क्षणिक आनंदाला मुकतो. आनंद सिनेमात एक डायलॉग आहे, ‘जिंदगी बडी होनी चाहिये, लंबी नही.’ आजच्या यांत्रिक युगात प्रत्येक जण सगळे मिळविण्याच्या नादात, आहे त्या आनंदाला गमावून बसतो. महिना दहा हजार रुपये पगार असणारा गरीब माणूसदेखील आनंदात राहतो; पण महिन्याला लाखो रुपये कमावूनसुद्धा बऱ्याच जणांना रात्रीची झोप लागत नाही, कारण आनंद मिळविण्यासाठी वारेमाप घेतलेली कर्जे आयुष्य संपत आले तरी संपत नाहीत.मी माझ्या मुलाला शाळेत नेण्यासाठी परळला टाटा रुग्णालयाच्या रस्त्याने जातो तेव्हा अगदी बालवयापासून तरुण, म्हातारी माणसे पहाटेपासून उपचारांसाठी रांगेत उभी राहिलेली पाहतो तेव्हा ‘देवा तुझे आभार. जे जीवन मिळालेले आहे ते आनंदात जाऊ देत. मिळणारा प्रत्येक क्षण मी आनंदात घालवीन,’ ही मनोमन प्रार्थना करतो. गावी जातो तेव्हा माझ्या शेतात लावलेली झाडे, पावसाळ्यातील हिरवीगार भातशेते मनाला प्रसन्न करतात.




आज जो-तो घड्याळाच्या काट्याप्रमाणे धावतो आहे, कुणाकडे दोन मिनिटे थांबायला वेळ नाही. सकाळी ट्रेन पकडायची व रात्री घरी येऊन जेवण करायचे व परत उद्याचा दिवस पुन्हा तसाच घालवायचा, हा नित्यक्रम ठरलेला. मग जीवनाचा आनंद कधी घेणार? प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगळी असते व ती वयानुसार बदलते. जसे की, बालवयात शाळेत असताना वर्गात मित्रांबरोबर गप्पा मारताना, त्यांच्या बरोबर एकत्र भटकताना किंवा खेळताना जो आनंद होतो, तो विरळाच. तरुण वयात ध्येयपूर्ती झाल्यावर आपल्याला आनंद होतो आणि वृद्धपकाळात भजन व देवाचे नामस्मरण करण्यात आनंद मिळतो.आज जग खूप जवळ आले आहे. क्षणात आपण जगाच्या कोणत्याही ठिकाणी संपर्क करू शकतो. पूर्वी एखादे खुशालीचे पत्र आले तरी खूप आनंद वाटत असे. येणारा रविवार आनंद देऊन जात असे. सणांना आप्तेष्ट हजेरी लावत. मस्त गप्पा आणि घरची पंचपक्वान्ने खाताना दिवस आनंदात जात असे. आज डिजिटल युगात कोणाकडे कुणाशी बोलण्यासाठी वेळ नाही. मोबाइलवरूनच सगळ्यांची भेट होते, पण पूर्वीसारखा आनंद त्यात नसतो. एवढेच काय, प्रवासातसुद्धा खिडकीतून बाहेरील निसर्गाचा आनंद न घेता खाली मान घालून आपण मोबाइलमध्ये गुंतलेलो असतो. आज मुलांना खेळण्यासाठी मैदानेच उरली नाहीत म्हणून ती खेळाच्या आनंदाला मुकली आहेत.येणाऱ्या नवीन पिढीला एवढेच सांगणे की, वेळीच आर्थिक नियोजन करा, वेळेचे नियोजन करा, ज्ञान वाढवा व केवळ स्वतःला सिद्ध करण्यासाठी कर्जबाजारी न होता येणारा प्रत्येक क्षण आनंदाने जगा. आनंद जसा घेता आला पाहिजे तसा तो देताही आला पाहिजे. चार्ली चॅप्लिनचे वैयक्तिक आयुष्य दुःखात होते, पण आयुष्यभर त्याने जगाला हसविले. गरजवंताला मदत केल्याने त्यांच्या चेहेऱ्यावर स्मितहास्य येते तेव्हा, आपणाकडून काहीतरी चांगले काम झाल्याचा आनंद मिळतो. आहे त्यापेक्षा अधिक किंवा दुसऱ्यापेक्षा जास्त मिळविण्याच्या नादात आपण आहे त्या आनंदाला गमावून बसतो. विचार करा की, जगातील नव्वद टक्के जनतेपेक्षा आपण सुखी आहोत. नकारार्थी विचार बदलून सकारात्मक रहिलात तर आनंद तुमच्यापासून कोणीही हिरावून घेणार नाही.

# प्रदूषक रसायनांचा पसारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

सदोदित अखंडपणे सर्वच परिसंस्थांत आढळणारी ‘फॉर एव्हर केमिकल्स’ हे मानवनिर्मित पदार्थ असून ‘परफ्लुरोअल्काइल्स’ आणि ‘पॉली फ्लुरोअल्काईल्स’ (पीएफए) या प्रकारची रसायने आहेत. निरनिराळ्या सौंदर्य प्रसाधनांत आणि शाम्पूमध्ये त्यांचा वापर होतो. तसेच, स्वयंपाकाच्या नॉनस्टिक भांड्यांत लावलेल्या जलविरोधी आवरणात व अन्नपदार्थांच्या वेष्टनात हे पदार्थ आढळतात. पाण्याबरोबर वाहून हे गटारात जातात. तसेच, भूमीभरण क्षेत्रातही यांचा निचरा केला जातो. अशा रीतीने पर्यावरणात यांचा सर्वव्यापी संचय होत असतो.



फ्लोरिडा आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील संशोधकांनी फ्लोरिडाच्या किनाऱ्यावरील नव्या संशोधनावाटे हे नमूद केले आहे की, ही प्रदूषके समुद्रातही पोहोचतात. त्यांच्या अभ्यासात हे आढळले की, पीएफए हे नादुरुस्त सेप्टिक टँक आणि इतर सांडपाण्याच्या गळतीमुळे चांगल्या पाण्यात मिसळतात. पीएफएचा सर्वांत मुख्य स्रोत हा आहे. त्याचप्रमाणे सैन्यदल आणि विमानतळावरील विविध रचनांतून पाण्यात सोडलेली ही प्रदूषके आसपासच्या पाणथळ जागेत फेसांच्या स्वरूपात साचून राहतात. उपसागरात उघडणाऱ्या कालव्यांमध्ये या प्रदूषकांचे प्रमाण सर्वांत जास्त असते. मात्र, उपसागर महासागरात परावर्तित झाल्यावर त्यांचे प्रमाण कमी होते. जसा खोल समुद्र येतो, तसे तेथील पाणी जास्त खारट असल्यामुळे पीपीएफ प्रदूषके कमी प्रमाणात विरघळतात.

अमेरिकेत नुकत्याच झालेल्या सरकारी पाहणीनुसार, अमेरिकाभर पसरलेल्या नळाच्या पाण्यात अशा प्रकारची किमान ४५ टक्के रसायने आढळली. बऱ्याच प्रमाणात अमेरिकन व्यक्तींच्या रक्तातही यांचे प्रमाण आढळले. ही रसायने रक्तात मिसळल्यानंतर, विविध प्रकारच्या रोगप्रतिकारक शक्ती संपुष्टात आणणाऱ्या व्याधींशी सामना करावा लागतो. तसेच, संप्रेरके नियंत्रित करणाऱ्या संस्थेचे काम अडखळते. नीट होत नाही. वाढीच्या वयात, प्रजनन काळात यांचा अधिक प्रभाव पडतो. चेतासंस्थेचे विकार तसेच मूत्राशय, यकृत, किडनी आणि वृषणाच्या कॅन्सरचा धोका या ‘फॉर एव्हर रसायनां’मुळे वाढतो.सागरी परिसंस्थेत अनेक मत्स्य प्रजाती आणि सागरी सस्तन प्राणी यांच्या रोगप्रतिकारक क्षमतेवर या रसायनांचा विघातक परिणाम होतो. भारतातही असा अभ्यास होणे आवश्यक आहे. येथील कॅन्सरचे वाढते प्रमाण पाहता अशा अभ्यासाची निकड जाणवते.

# तापमानाचा कोंबड्यांवर परिणाम

लोकनेता न्यूज नेटवर्क



वाढत्या हवामानाचा परिणाम कुक्कुटपालनावर झालेला आढळून येतो. ऋतूंचा विचार केला असता, उन्हाळा ऋतूमध्ये कोंबडी हा पक्षी इतर पाळीव प्राण्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात उष्माघातास बळी पडतो, त्यामुळे प्रत्यक्षपणे मांसल व अंडी देणाऱ्या कोंबड्यांच्या उत्पादनात घट होते.

ज्या वेळी कोंबड्यांच्या सभोवतालचे तापमान ३८ ते ४० अंश से.पर्यंत पोचते, त्या वेळी त्यांना वाढलेल्या तापमानाचा त्रास जाणवू लागतो. उष्णता कमी करण्यासाठी कोंबड्या तोंडाची उघडझाप करतात, त्याला धापा टाकणे असे म्हणतात. जास्त प्रमाणात धापा टाकल्यामुळे श्वसन संस्थेच्या कडेवर असलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होते. कोंबड्यांच्या सततच्या तोंडाची उघडझाप करण्याने श्वसनाचा वेग वाढतो, तसेच हृदयाच्या स्पंदनांमध्ये वाढ होते, त्यामुळे रक्तदाब वाढतो व यामुळे कोंबड्या मृत्युमुखी पडू शकतात.

असा ओळखा उष्णतेचा त्रास१) कोंबड्यांना जर उष्णतेचा त्रास जाणवत असेल, तर त्या शांतपणे उभ्या राहतात, त्यांच्यामध्ये मंदपणा व सुस्तपणा दिसून येतो.

२) काही कोंबड्या या पाणी पिण्याच्या भांड्याजवळ मान वाकवून उभ्या असतात, तसेच काही कोंबड्या या भिंतीचा आडोसा घेऊन शांतपणे उभ्या असतात.

३) उन्हाळ्यात जर कोंबड्यांना उष्माघाताचा त्रास जाणवत असेल, तर त्या जास्त पाणी पितात व खाद्य कमी प्रमाणात खातात.

४) कोंबड्या शरीरातील वाढलेल्या उष्णतेला कमी करण्यासाठी व थंडपणा आणण्यासाठी त्यांचे पंख शरीरापासून दूर पसरवितात.

५) उष्णतेला कमी करण्यासाठी कोंबड्या तोंडाची सतत उघडझाप करून धापा टाकताना शेडमध्ये दिसून येतात.

६) काही कोंबड्या श्वास घेण्यास धडपडू लागतात व त्यांना दम लागतो.

७) काही कोंबड्यांना उष्माघातामुळे मानसिक धक्का बसतो, त्यांचे पाय लटपटतात आणि ठराविक काळासाठी त्या चक्कर येऊन खाली पडतात.

८) काही कोंबड्या या शेडमधील इतर कोंबड्यांच्या मागच्या भागाची पिसे तोडताना दिसून येतात.

९) कोंबड्यांच्या वजनात अचानकपणे घट होते.

१०) त्यांची त्वचा रखरखीत होते व रंगांमध्ये फरक दिसून येतो.

११) कोणत्याही प्रकारचे कारण नसताना, कोंबड्यांच्या अंडी देण्याच्या व अंडी उबविण्याच्या क्षमतेतसुद्धा कमीपणा आलेला दिसून येतो.

१२) कोंबड्यांच्या अंड्यांचा आकार हा लहान होतो व त्यांच्या अंड्यांच्या कवचाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची झालेली दिसून येते.

१३) मांसल कोंबड्यांमध्ये उष्माघातामुळे वाढीचा दर कमी होतो व त्या अधिक प्रमाणात उष्माघातामुळे मृत्युमुखी पडतात.

उन्हाळ्यातील व्यवस्थापन

कोंबड्यांना उष्माघातापासून वाचविण्यासाठी त्यांना चांगल्या प्रकारे आच्छादित भिंत व छताच्या शेडमध्ये ठेवावे. त्याचप्रमाणे शेडमध्ये हवा खेळती राहील अशा ठिकाणी व दिशेस शेडची बांधणी करावी. छताच्या पुढच्या बाजूला २४ इंच एवढ्या लांबीचे आच्छादन बसवावे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वी छताची सफाई करावी व त्यास पांढऱ्या रंगाने रंगविणे फायदेशीर ठरते, तसेच छतावर वाळलेल्या गवताच्या पेंढ्या, भाताचा कोंडा टाकावा व त्यास ओले ठेवावे.

दिवसातून तीन-चार वेळेस छतावर पाण्याची फवारणी करावी. असे केले असता शेडमधील तापमान कमी होऊन कोंबड्यांना थंडावा मिळतो. शेडच्या एका बाजूला पोत्याचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे, जेणेकरून शेडमध्ये थंडपणा राहील व कोंबड्यांना उष्माघातापासून वाचविता येईल.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शेडमध्ये ताजी हवा खेळती ठेवणे फार महत्त्वाचे आहे. हवा खेळती न राहिल्यामुळे शिळी व दूषित हवा पक्ष्यांच्या शेडमध्ये तयार होते व त्या हवेत अमोनिया, ओलसर कार्बन- डाय-ऑक्साईड व धुळीचा शिरकाव होतो व कोंबड्यांवर ताण येऊ शकतो.

नैसर्गिक हवा शेडमध्ये खेळती ठेवण्यासाठी पंख्यांचा वापर करावा, जेणेकरून शेडमधील हवेची हालचाल वाढेल व आत असलेली अधिक उष्णता बाहेर टाकली जाईल. त्याचप्रमाणे शेडमध्ये तयार झालेली शिळी हवा बाहेर घालविण्यासाठी बाहेर हवा फेकणाऱ्या पंख्यांचा वापर करणे फायदेशीर ठरेल. उष्माघातावर मात करण्यासाठी आहारातील समतोल राखणे गरजेचे आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कोंबड्यांच्या खाद्यांमध्ये अचानकपणे बदल करू नये. उन्हाळ्यामध्ये कोंबड्यांना खात्रीशीर, स्वच्छ, थंड व मुबलक पाण्याची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. याकरिता शेडमधील पिण्याच्या पाण्याची भांडी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ३५-५० टक्क्यांनी वाढवावी.

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कोंबड्यांच्या जास्त हालचालींमुळे त्यांच्या शारीरिक उष्णतेत वाढ होऊन, त्यांच्यावर उष्णतेचा ताण येऊ शकतो. हे टाळण्यासाठी कुक्कुटपालकाने व तेथील कामगाराने जास्त वेळा शेडमध्ये जाणे टाळावे. शेडमध्ये पक्ष्यांची अधिक गर्दी असेल, तर पक्ष्यांची घनता कमी करावी.

# डॉ.ज्योतिताई मेटे यांनी लोकसभा लढवावीच;बहूजन समाजाची मागणी

## जनतेच्या मनामनात लोकनेते स्व.विनायक मेटेंचे स्थान अढळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

मराठा हृदय सम्राट स्व. विनायक मेटे यांच्या सुविद्य पत्नी ज्योतिताई मेटे यांनी समाजाच्या प्रश्नांसाठी लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी आपल्या सुपर क्लासवन असलेल्या नोकरीची राजीनामा दिला, व महाविकास आघाडी कडून लोकसभा निवडणूक लढविण्याचा तयारी सुरू केली, त्यासाठी शरद पवार यांच्याशी दोन ते तीन वेळा भेट घेऊन बैठक झाली, त्यावेळी शरद पवार साहेबांच्या मनात सुध्दा डॉ.ज्योतिताई मेटे यांचे नाव अग्रक्रमी होते,परंतु ऐनवेळी शरद पवार यांनी बजरंग सोनवणे यांना उमेदवारी जाहीर झाली आणि ज्योतीताई मेटे यांना शरद पवारांनी उमेदवारी नाकारली. या सर्व घटनेनंतर शुक्रवारी ज्योतीताई छत्रपती संभाजीनगर वरून बीडकडे येत होत्या त्यावेळी छत्रपती संभाजी नगर वरून एकट्या येत असताना बीडच्या जिल्ह्याच्या वेशीवर मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर !!

लोग साथ आते गए और कारवाँ बनता गयाऋ या प्रमाणे ज्योतीताईंच्या स्वागतासाठी बीड जिल्ह्यातून जवळपास २०० गाड्या ताफ्यासह गेवराई, बीड तालुक्यात ताईंचे अति भव्य स्वागत बीड जिल्ह्यातील नागरिकांनी केले. हा सर्व प्रकार पाहता पवारांनी जरी ताईंना डावलले असले तरी बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या मनात ताईंचे स्थान अढळ असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.बीड शहरात आल्यानंतर सर्वप्रथम ज्योतीताईंनी स्व. विनायकराव मेटे यांच्या समाधी स्थळी जाऊन दर्शन घेतले आणि त्यानंतर बौड शहरातील विविध महापुरुषांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यानी अभिवादन केले.जागोजागी होत असलेले सत्कार आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले नागरिक यावरून

वर ज्योतीताईंबद्दल जनमानसात असलेली आपुलकी आणि जिव्हाळा दिसून आला.आगामी लोकसभा निवडणुकीच्यादृष्टीने प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या बीड मतदारसंघात यंदा चुरशीची लढाई पाहायला मिळण्याची शक्यता आहे. बीडमध्ये महायुतीने भाजपच्या पंकजा मुंडे यांना रिंगणात उतरवले आहे. तर महाविकास आघाडीकडून शरद पवार गटाचे बजरंग सोनावणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे बीड लोकसभेची लढाई या दोन नेत्यांमध्येच होईल, असा अंदाज होता. परंतु,आता

बीड लोकसभेच्या रिंगणात आणखी एक तगडा उमेदवार



उतरण्याची शक्यता आहे. लोकसभेसाठी शिवसंग्राम संघटनेचे दिवंगत लोकनेते विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे तगडे आव्हान देऊ शकतात अशी चर्चा सुरु आहे. ज्योतीताई मेटे या शरद पवार गटाकडून लढण्यासाठी इच्छूक होत्या.मात्र, शरद पवार गटाने बीडमधून बजरंग सोनावणे यांना उमेदवारी देऊ केली.परंतु पवार साहेबांनी असे काय पाहिलं,की सोनवणे यांना उमेदवारी देऊ केली,ज्यांनी मागील लोकसभेत पराभूत झाल्यानंतर पुनः कधीही मतदारसंघात डुंकून सुद्धा पाहिलं नाही, किंवा राज्यभर मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी लोकशाही मार्गाने मोठमोठे आंदोलन झाली त्याठिकाणी उघड पाठिंबा दिलेला दिसलं नाही किंवा रस्त्यावर उतरले किंवा जाहीर पाठींबा दिला नाही.अशी सुद्धा चर्चा होतांना दिसत आहे, त्यामुळे सद्य परिस्थिती मराठा समाजाची दुद्धा मनस्थिती निर्माण झाली आहे, त्यामुळे ज्या माणसानं आयुष्यभर मराठा, धनगर, मुस्लिम समजला आरक्षण मिळावे यासाठी रस्त्यावरील व किंवा सभागृहात आवाज उठवला यामुळे सध्यातरी बीड जिल्ह्यात डॉ.ज्योती मेटे यांचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे ज्योतिताई काय करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

**डॉ.ज्योतीताई मेटे हे ठरणार प्रस्थापितांना डोकेदुखी ?**

मराठा समाजासह धनगर, मुस्लिम समाजाला सुद्धा आरक्षण मिळावे यासाठी स्व.विनायक मेटे हयातभर, संघर्ष केला व शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला आहे त्यामुळे त्यांच्याविषयी जनमानसात असणारी सहानुभूती, तसेच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाचे केंद्र बीड जिल्हा असल्याने त्याचा सुद्धा फायदा डॉ.ज्योतिताई मेटे यांना होऊ शकतो अशी चर्चा जनमानसात होतांना दिसत आहे.

**निवडणूक लढवावी अशी आष्टी तालुक्यातील जनतेचा कौल**

डॉ.ज्योतिताई मेटे यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी की नाही यासाठी यासाठी जन कौल जाणून घेण्यासाठी आष्टी तालुक्यातील गावातील नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी आले असता तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांच्यासह अन्य पदाधिकारी यांना सोबत घेऊन यांच्यासोबत आष्टी तालुक्यातील कडा, धामणगाव,मसोबावाडी, गौखेल, सावरगाव आदी गावात जनमत जाणून घेतांना दिसत आहे, पुढे लवकरच प्रत्येक गावात वाडी वस्तीवर सुध्दा दौरा करणार असल्याचे समजते, यावेळी अनेक गावात डॉ.ज्योतिताई मेटे यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी होतांना दिसत आहे.

# माजी मंत्री बबनराव घोलप शिंदेंच्या शिवसेनेत दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शिवसेना ठाकरे गटात नाराज असलेले माजी मंत्री बबनराव घोलप यांनी आज अखेर शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. दोन महिन्यांपूर्वीच बबनराव घोलप यांनी उद्धव ठाकरेंकडे आपल्या पदाचा राजीनामा सोपवला होता. मात्र ठाकरेंकडून कुठलेही उत्तर न आल्याने त्यांनी आज अखेर शिंदे गटाची वाट निवडली. बबनराव घोलप यांच्यासह माजी आमदार संजय पवार यांनी देखील एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला.



माजी मंत्री राहिलेले बबनराव घोलप उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार आहे. मात्र त्यांचे पुत्र योगेश घोलप यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार की उद्धव ठाकरे बरोबर राहणार? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. घोलप यांच्यासोबत आणखी काही पदाधिकारी शिंदे गटात जाणार असल्याची शक्यता आहे.

नाशिकमध्ये नुकतेच झालेल्या ठाकरे गटाच्या अधिवेशनालादेखील बबनराव घोलप उपस्थित नव्हते. तेव्हापासून ते उद्धव ठाकरे यांची साथ सोडणार असल्याची चर्चा रंगली होती. बबनराव घोलप पाच वेळा आमदार राहिले आहे. १९९० ते २०१४ दरम्यान नाशिकमधील देवळाली विधानसभा मतदार संघातून ते निवडून आले आहे. आता शिर्डीमधून निवडणूक लढवण्याची त्यांची इच्छा होती. परंतु उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे तिकीट न मिळाल्याने ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल होत आहे.बबन घोलप हे शिवसेनेचे जेष्ठ नेते आहेत. त्यांनी मंत्रीपदही भूषविले आहे. शिवसेनेत फुट पडल्यानंतरही त्यांनी ठाकरे गटातच राहण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यानच्या काळात खासदार हेमंत गोडसेंसह शिंदे गटात अनेकांनी प्रवेश केला. पण, घोलप यांनी ठाकरे गटातच राहणे पसंत केले होते.

# अकोल्यातही भाजपला धक्का देण्याच्या तयारीत काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा देण्याची शक्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अकोला (वृत्तसंस्था)**

अमरावतीनंतर आता प्रहारचे आमदार बच्चू कडे हे अकोल्यात भाजपला दे धक्का देण्याच्या तयारीत आहेत. बच्चू कडू आता अकोल्यातील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांना पाठिंबा देण्याची शक्यता आहे. अमरावतीमध्ये खासदार नवनीत राणा यांच्या उमेदवारीला विरोध केल्यानंतर देखील त्यांना भाजपकडून उमेदवारी घोषित करण्यात आली. त्यानंतर आमदार बच्चू कडू हे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपला शक्य त्या ठिकाणी विरोध करण्याची भूमिका त्यांनी घेतली असल्याचे चित्र आहे.



अकोल्यात रविवारी प्रहार जनशक्ती पक्षाचा जिल्हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात याबाबतचा निर्णय होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अमरावतीत नवनीत राणा यांना उमेदवारी दिल्यानंतर बच्चू कडू भाजपवर नाराज आहेत. तसेच ते अनेकदा याबाबतची नाराजी स्पष्टपणे व्यक्त करत आहेत. अमरावतीप्रमाणेच अकोल्यातही बच्चू कडू यांचा समर्थकांची संख्या जास्त आहे. बच्चू कडूंनी अकोल्यात काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा दिला तर त्याचा परिणाम जिल्ह्यासह राज्याच्या राजकारणावर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.महाविकास आघाडीचे सरकार असताना बच्चू कडू अकोल्याचे पालकमंत्री होते. जिल्ह्यातील अकोट विधानसभेत प्रहारला २५ हजार तर मूर्तिजापूर विधानसभेत १० हजार मतदान पडले होते. अकोला जिल्हा परिषदेत प्रहारचा एक जिल्हा परिषद सदस्य होता. तर अकोट पंचायत समितीतही एक सदस्य आहे. अमरावतीप्रमाणेच अकोल्यातही बच्चू कडूंना मानणारा मोठा वर्ग आहे. गेल्या विधानसभेवेळी प्रहारच्या उमेदवारांना मिळालेले मतदान लक्षात घेतले तर लोकसभेला बच्चू कडू हे भाजपच्या उमेदवाराचे राजकीय गणित बिघडवू शकतील अशी शक्यता आहे.दरम्यान, अकोला लोकसभा मतदारसंघ हा राज्यातील लक्षवेधी मतदारसंघांपैकी एक आहे. इथे वंचित बहुजन आघाडीकडून स्वत: प्रकाश आंबेडकर, महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील आणि भाजपकडून महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे हे रिंगणात असणार आहेत. वंचित आणि महाविकास आघाडीची चर्चा असफल झाल्यानंतर काँग्रेसने अकोल्यात प्रकाश आंबेडकरांच्या विरोधात उमेदवार दिला आहे.

# फारूक काझी यांच्या पुस्तकाला राज्यस्तरीय पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**



नाझरा गावचे रहिवासी व जि. प. शाळा, गौडवाडी येथे शिक्षक म्हणून कार्यरत असणारे फारूक एस. काझी यांच्या राजहंस प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या 'जादुई दरवाजे' या पुस्तकाला कुंडल कृष्णाई प्रतिष्ठान, सातारा या प्रख्यात संस्थेचा 'उत्कृष्ट बाल कथासंग्रह राज्यपुरस्कार-२०२४' जाहीर झाला आहे. लवकरच साताऱ्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

फारूक काझी यांच्या बहुतांश पुस्तकांना साहित्य पुरस्कार मिळालेले आहेत. एक उपक्रमशील शिक्षक, प्रशिक्षक, लेखक अशा अनेक भूमिका ते पार पाडत आहेत. बालसाहित्यिक व बालसाहित्याचे अभ्यासक म्हणून त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.त्यांची मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांनी प्रकाशित केलेली 'चुटकीचं जग' ही किशोर कादंबरीचा 'शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' च्या मराठी एम. ए. च्या अभ्यासक्रमात समावेश झालेला आहे. तसेच त्यांची 'रोजा' या कथेचा 'गोगटे कॉलेज, रत्नागिरी' (स्वायत्त) या मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महविद्यालयाच्या मराठी पदवी अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. नुकताच त्यांच्या 'कोकोची डायरी' या पुस्तकाच्या मुखपृष्ठाला प्रख्यात संस्था 'अखिल भारतीय प्रकाशक संघा'चा उत्कृष्ट मुखपृष्ठाचा द्वितीय क्रमांक मिळाला आहे.

# मंद्रुप येथील इफ्तार पार्टीत मालक व साहेब दोघांनी एकत्र घेतला आस्वाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

रमजान हे पवित्र पर्व मानले जाते. मुस्लीम बांधव रमजानमध्ये संपूर्ण महिना तीस दिवस उपवास करतात. सर्वधर्मीय एकत्र येऊन इफ्तार पार्टीत गुण्यागोविंदाने सहभागी होतात यातून सर्वधर्म समभाव दिसून येतो. हिंदू-मुस्लीम भाईचारा महत्त्वाचा असल्याचे माजी आमदार दिलीप माने यांनी इफ्तार पार्टीप्रसंगी सांगितले.



काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे तालुकाध्यक्ष अफजल शेख यांनी शुक्रवारी मंद्रूप येथील जामा मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी सोलापूर जिल्हा दुध संघाचे संचालक सुरेश हसापुरे म्हणाले, हिंदू-मुस्लीम भाईचारा कायम असावा अशी अपेक्षा व्यक्त करीत मुस्लीम बांधवांसह सर्वांना रमजान सणाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष हरिष पाटील, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष वसिम पठाण, माजी कृषी सभापती अप्पाराव कोरे, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने, माजी उपसरपंच रमेश नवले, पिर शेख साहेब ट्रस्टचे अध्यक्ष शब्बीर मुल्ला, मोतीलाल राठोड, अप्पासाहेब काळे, गंगाधर बिराजदार, माजी सरपंच नजीर आवटे, माजी सरपंच बक्षूभाई मुल्ला, सलीम शेख (सेक्रेटरी), लक्ष्मण सुतार, महादेव टेळे, धनंजय म्हेत्रे, निखिल देशपांडे, बाबूलाल निगेवान, उमाशंकर रावत, अप्पासाहेब शिळ्ळे, मलकारी शेंडगे, संतोष बरूरे, संदीप मेंडगुदले, राम पवार, सिद्धू खरात, दानेश शेख, महमद शेख यांच्यासह हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येत उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार पंचाक्षरी स्वामी यांनी केले तर आभार मुबारक मोमीन यांनी मानले.

# भाजपा चे स्वप्न ४०० पार अशक्य मतदार संघात मतदात्याची नाराजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर बुलढाणा लोकसभा मतदारसंघात बुलढाणा, चिखली, सिदखेडराजा, मेहकर, खामगाव, व जळगाव जामोद या सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश करण्यात आला आहे तर जिल्ह्यातील एकमेव मलकापूर विधानसभा मतदारसंघ खानदेश रावेर लोकसभा मतदारसंघाची जोडण्यात आला रावेर लोकसभा मतदारसंघात खानदेश मधील चोपडा रावेर भुसावळ जामनेर मुक्ताईनगर हे पाच विधानसभा मतदारसंघ आहे मलकापूर विधानसभा मतदारसंघातील मतदारासह कोणत्या च नेत्यांचा खानदेश मधील विधानसभा मतदार संघाची संबंध नसल्याने रावेर लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच संघाशी संबंध नसल्याने रावेर लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षाचे व अपक्ष उमेदवार हे खानदेश चेच असतात त्यामुळे मलकापूर विधानसभा मतदारसंघातील मतदारांना नाईलाजाने मतदान करावे लागते व हा मतदार संघ सर्व बाबीने अपेक्षित राहतो ही बाब स्पष्ट झाली आहे.

मलकापूर विधानसभा मतदारसंघात नांदुरा तालुका जोडलेला असून सन १९८५ व सन २०१९ चा अपवाद वगळता भाजपाचा बालेकिल्ला झालेला आहे. सन २०१९ च्या विधानसभा मतदार संघात लहानपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनसंघ व भाजपाशी नाळ जोडलेले राजेश खेकडे यांनी भाजपा सोडून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला होता नांदुरा न प मध्ये राजेश इकडे त्यांची आई पत्नी व त्यांनी नगराध्यक्ष पद भूषवलेले असलेल्या राजेश एकडे यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी विधानसभेसाठी त्यांना उमेदवारी दिली होती या निवडणुकीत सलग् १९९५ १९९९ २००४ २००९ व २०१४ निवडणूक जिंकलेल्या विद्यमान आमदार जिंतूर संचेती या भाजपाच्या नेत्यांनी भिडत झाली आणि त्या निवडणुकीत संचेती यांचा १४५०० मतांनी आघाडी घेऊन इकडे यांनी विजयी श्री खेचून आणली होती तर सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीमती रक्षा निखिल खडसे यांनी येथील मतदारांनी मतांची आघाडी मिळवून दिली होती त्यामुळे संचेती यांचा दारुण झालेला पराभव व एकडे यांचा झालेला विजय ठरला होता

मलकापूर विधानसभा मतदारसंघात मतदानासाठी ३०४ मतदान केंद्रे असून एक लाख ४६ हजार ४९६ पुरुष व ४३ ३० ७१ स्त्रिया असे एकूण दोन लाख ७९ हजार ५७३ मतदार आहेत रावेर लोकसभा मतदारसंघात बहुतांश सहा ही विधानसभा मतदारसंघात मतांची आघाडी मिळाली होती भाजपाने रक्षा खडसे यांना तिसऱ्यांदा उमेदवारी देऊन उमेदवारी बाबत सुरू असलेली

सुंदोपसुंदी संपुष्टात आणली तर महाविकास आघाडीच्या जवळ रक्षा खडसे यांच्या विरोधात अद्यापही उमेदवार सापडलेला नाही तर रक्षाताई खडसे यांचे सासरे माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसची संधान बांधले आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपकी बार ४०० के पार असा नारा देऊन विरोधकांची झोप उडवली आहे आणि मतदारांना विविध प्रलोभने देत असले तरीही भाजपाने त्यांना दक्षिणेसह आठ राज्यात १६५ जागाबाबत चिंता लागली आहे विशेष म्हणजे भाजपाच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिसा, कर्नाटक, पंजाब व हरियाणातील सुमारे १६५ जागावर भाजप आणि मित्र पक्षाची स्थिती चिंताजनक आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात महागाई आटोक्यात ठेवली नाही तरुणांना रोजगारही मिळवून देण्यासाठी कोणताही उपाययोजना नाही तर स्वस्त दुकानाच्या माध्यमातून बोगस धान्य पुरवठा देखील केल्याने नागरिकांना आळशी केले असे अनेक आरोप त्यांच्यावर होत असल्याने त्यांचा फायदा महाविकास आघाडी विरोधी पक्षाच्या उमेदवारांना शकतो सन २०१९ मध्येही नरेंद्र मोदीच्या विरोधात रोज उत्पन्न झालेला होता तरी त्यांना २९० कशा प्राप्त झाल्या होत्या हा संशोधनाचा विषय असून काही जादू झालीच तर भाजपाला बहुमत मिळू शकेल त्यामुळे कमकुवत मतदार संघावर भाजपाचे नेते लक्ष केंद्रित करीत असल्याचे चित्र दिसत आहे त्यासाठी भाजपासाठी बालेकिल्ले असलेले मतदार संघावर अगोदर लक्ष केंद्रित करावे लागेल जेणेकरून त्याचे स्वप्न साकार होऊ शकते अन्यथा ४०० के पार हा नारा त्याचा फुसका ठरेल यात शंका नाही

## साहित्यधारा संभाजीनगर तर्फे २०२४ बुद्ध जयंती निमित्त आयोजित

# चलो बुध्दकी ओर कविसंमेलन अध्यक्षपदी डॉ. विजयकुमार कस्तुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवत**

सामाजिक तथा सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांच्या आयोजनासाठी महाराष्ट्रंच नव्हे तर अंतर्राष्ट्रीय स्तरावरील बहुचर्चित संस्था - साहित्यधारा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, संभाजीनगर/औरंगाबाद च्या वतीने गतवर्षी प्रमाणेच याही वर्षी २०२४ - बुध्दजयंतीच्या पावन पर्वावर छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या सुंदर सभागृहामधे दि. ०५-०५-२०२४ रोजी स. ११ ते सायंकाळी ०५ दरम्यान ' चलो बुध्दकी ओर ' या नांवाने निमंत्रित कवींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले असून सोबतच सामाजिक, सांस्कृतिक साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील समर्पित कार्याचा गौरव म्हणून काही मान्यवरांना संस्थेच्या वतीने समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असून तोही पुरस्कार वितरण सोहळा याच कार्यक्रमात संपन्न होत आहे.

सदर कवी संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी अंतर्राष्ट्रीय ख्याती प्राप्त कवी डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांच्या नांवावर संस्थेच्या सर्व मा. पदाधिकाऱ्यांकडून शिक्कामोर्तब झाल्याचे, त्या निमित्ताने दि. ०५-०४-२०२४ रोजी संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथे आयोजित प्रासंगिक बैठकीमधे संस्था अध्यक्ष तथा स्कॉटलंड यार्ड स्टुडंटस् ब्रँड बेसेडर असलेले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर/ औरंगाबाद मधे अर्थशास्त्र विभागात सेवारत असलेले ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉ. संघर्ष सावळे यांनी जाहीर करून या भव्यदिव्य कवि संमेलनाच्या अध्यक्षपदाचे निवडपत्र, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक व ज्येष्ठ कवयित्री तथा या कविसंमेलाच्या प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित आयुष्मती तस्निम पटेल, संभाजीनगर/औरंगाबाद तथा भावस्पर्शी कवयित्री आयुष्मती शीतल शेगोकार, शेगाव यांच्या उपस्थितीत, डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांना सन्मानाने प्रदान केले.



तसेच या संमेलनाच्या उदघाटक म्हणून छ. संभाजीनगर च्या समाज कल्याण आयुक्त मा. आयुष्मती जयश्री सोनकवडे यांना तर प्रमुख अतिथी या नात्याने सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या नाट्य विभागाचे प्राध्यापक आयुष्मान किशोर शिरसाट यांना व महाराष्ट्र शासन विभागीय पोलीस तक्रार निवारण प्राधिकरण, औरंगाबाद चे अध्यक्ष तथा माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश आयुष्मान दे. ज. शेगोकार यांनाही सन्मानाने निमंत्रित करण्यात आले असल्याचेही संस्था अध्यक्ष डॉ. संघर्ष सावळे यांनी यावेळी जाहीर केले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी औरंगाबाद येथील केंद्रीय विद्यालय विभाग प्रमुख प्रा. प्रकाश शिरसाट तसेच आयुष्मती शीतल शेगोकार यांच्या सह संस्थेच्या इतर पदाधिकारी मंडळींनी मोलाचे योगदान दिले.

## भोकरदन येथे रमजान ईदच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी

# कपडे, सुकामेवा, सौंदर्य प्रसाधने,अत्तर आणि विविध खरेदीसाठी बाजारपेठ सजली : 'ड्राय फ्रूट' ची मागणी वाढली



**रमजान ईदच्या निमित्त भोकरदन येथे सुकामेवा च्या दुकानावर खरेदी करतांना ग्राहक**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

: मुस्लिम समाजात पवित्र समजली जाणारी रमजान ईद निमित्त खरेदीसाठी बाजारपेठ गजबजली आहे.या निमित्त भोकरदन शहरात रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर बाजारात सुकामेवासह ठिकठिकाणी विविध वस्तूंची दुकाने थाटली असून मुस्लिम बांधवांची खरिदी सुरू झाली असून.कपडे, ज्वेलरी विविध सौंदर्य प्रसाधने, सुकामेवा आदि खरेदीसाठी बाजारातील दुकानात मुस्लिम बांधवांची गर्दी दिसून येत आहे.

विशेष करून कपडयांच्या दुकानात महिला,चिमुकल्यांच्या कपड्यांना अधिक मागणी होत आहे.ईदनिमित्त बाजारपेठेत व्यावसायिकांनी नवनवीन पॅटर्न विक्रीसाठी आणले आहे.चिमुकल्यांना बाजारात असलेला नवीन पॅटर्न भूरळ पाडत आहे.विक्रेते देखील चिमुकल्यांचे विविध डिझाईन, आकर्षक कपडयांची मागणी पूर्ण करीत आहे.महिलांनीही बाजारपेठेत गर्दी केल्याचे दिसत आहे.शहरातील मुख्य बाजापेठेतील सराफा मार्केट,पोलीस स्टेशन समोर,नगरपरिषद समोर आदि ठिकाणी रमजान ईदच्या पार्श्वूमीवर कपडे, ज्वेलरी, विविध सौंदर्य प्रसाधने, पादत्राणे,सुकामेवा , सुगंधी अत्तर,घरातील साहित्य,शोभेच्या वस्तू व विविध प्रकारच्या खजूर ,फळे आणि विविध प्रकारच्या शेवयांची ठिकठिकाणी दुकाने थाटली आहेत. रमजान ईद काही दिवसांवर असली तरी मुस्लिम बांधव कपड्यांसह विविध प्रकारची खरेदी करतांना दिसत आहे.यासाठी विक्रेत्यांनी देखील रमजान ईदच्या पार्श्वुमीवर आपल्या दुकानात सर्वप्रकारचे कपडे व विविध प्रकारच्या वस्तू विक्रीसाठी दुकानात सज्ज ठेवल्या आहेत.

**सुकामेवा,खजूर व शेवयांना मोठी मागणी**

रमजान ईदला मुस्लिम बांधव घरी शीरखुर्मा बनवून आप्तेष्टांना घरी बोलवत असतात.त्यामुळे शीरखुर्मा तयार करण्यासाठी लागणाऱ्या बदाम,काजू ,खजुरला नागरिकांची मोठी मागणी आहे.दरम्यान,महगाईमुळे व्यापारात फरक पडला असल्याचे व्यापारी फरमान सिद्दीकी यांनी सांगितले.

**फरमान सिद्दीकी**
**किराणा दुकान चालक**

**चिमुकल्यांचे विविध डिझाईन, आकर्षक कपड्यांची मागणी वाढली**

रमजान ईदनिमित्त व्यावसायिकांनी दुकानात नवनवीन पॅटर्न विक्रीसाठी आणले आहे.दुकानदार चिमुकल्यांचे विविध डिझाईन,आकर्षक कपड्यांची मागणी पूर्ण करीत आहे.पुरुष व युवकांसह महिलांसाठी विविध पॅटर्न विक्रीसाठी दाखल झाले आहे.ईद जस जशी जवळ येत असल्याने दुकानात गर्दी वाढत असली तरी ही गर्दी रमजान ईदपर्यंत कायम राहील असा विश्वास आहे.


**शेख रफिक**
**कापड दुकानदार**

## मलकापूर अर्बन पुन्हा सुरू व्हावी करता मा.आ.चैनसुख संचेती याचे प्रयत्न सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

कोविड १९ च्या परिस्थीतीमुळे जगातील अनेक वित्तीय संस्था अडचणीत सापडल्या त्यातच मलकापुर अर्बन बँकेचा छझ- वाढल्याने बँकेवर रिझर्व बँकेने कारवाई केली. तथापि मलकापुर अर्बन बँक पुन्हा सुरु व्हावी, अशी सर्वसामान्य जनतेसह व्यापारी वर्गाची इच्छा होती. बँक पुन्हा सुरु व्हावी यासाठी श्री. चैनसुख संचेती यांनी अहोरात्र प्रयत्न केले. त्याकरिता न्यायालयीन व प्रशासकीय स्तरावर लढा दिला. त्याला यश म्हणून बँकेला थकीत रकमेच्या वसुलीची परवानगी मिळाली. या संधीचे सोने करुन श्री. चैनसुख संचेती व सर्व संचालक यांचे नेतृत्वात बँकेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी लक्षणीय कामगिरी करुन मोठ्या प्रमाणावर वसुली करुन दाखविली. बँकेने निर्बंध लागल्यापासून दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत रु. ५२७.७४ कोटी एवढी कर्ज खात्यामध्ये वसुली केली आहे. तसेच बँक थकीत कर्ज वसुलीसाठी युध्दपातळीवर काम करत असुन थकीत कर्जदारांवर विविध कोर्टामध्ये कारवाईसाठी प्रकरणे दाखल आहे. बँकेवर निर्बंध लागले त्या दिनांकास बँकेकडे रु. १२३६.१० कोटी च्या ठेवी होत्या, त्यापैकी रु. ४९६.९८ कोटीच्या ठेवी ऊखउऋ ने विमा संरक्षणापोटी ठेवीदारांना परत केल्या असून बँकेला त्याची परतफेड ५ वर्षांमध्ये प्रती वर्ष रु. ९९.३९ कोटी याप्रमाणे करावयाची आहे. बँकेने या परतफेडी पोटी एकूण रु. १९८.७८ कोटी DICGC कडे भरणा केला आहे. आज रोजी



बँकेकडे एकूण ठेवी रु. ६७३.६० कोटींच्या असून रु. ६७०.८५ कोटी एवढी लिक्वीडीटी आहे. तसेच एकूण येणे कर्ज रु. ५०९.४८ कोटी व त्यावरील थकीत व्याज रु. ४४१.७७ कोटी आहे. बँकेला दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात रु. ४८.९२ कोटी एवढा ढोबळ नफा झालेला आहे.

रिझर्व बँकेने केलेल्या एकतर्फी कारवाई विरुध्द बँकेव्दारे न्यायालयीन लढा देण्यात येत आहे. दिवसेंदिवस बँकेच्या आर्थिक परिस्थीतीत लक्षणीय सुधारणा होत असल्याने बँक पुन्हा पुर्वीप्रमाणे सुरु होईल अशी परिस्थीती निर्माण झाली आहे.

## चिंचा फोडुन बेरोजगारीवर मात

# लिंबागणेश मध्ये दुष्काळी परिस्थितीत महिलांच्या हाताला काम-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

यंदाचा कडक उन्हाळा त्यातच शेतीतील कामे उरकल्यामुळे मोल मजुरीच्या कामाचा वानवा जाणवत असतानाच दुष्काळी परिस्थितीत लिंबागणेश परीसरात चिंचा फोडण्याच्या कामामुळे अनेकांच्या हाताला काम मिळाले असुन या कामामुळे शेकडो कुटुंबियांचा रोजी रोटीचा प्रश्न काही अंशी मार्गी लागला असुन बेरोजगारी वर मात मिळविल्याचे दिसून येत आहे. लिंबागणेश येथे चिंचेचे स्थानिक व्यापारी असुन गुरूवारी बाजार दिवशी बाहेरून ही काही व्यापारी येऊन येथे व्यवसाय करतात. थेट झाडावरून चिंच आणुन ती मजुरांकडून फोडुन घेऊन फोडलेली चिंच अहमदनगर, बार्शी, जामखेड येथील बाजारपेठेत पाठवण्यात येते.मजुरांच्या हाताला काम मिळते मजुरांना १ किलोला २० रूपये मोबदला दिला जातो. १ किलो चिंच फोडण्यासाठी २० रूपये मिळतात. एका जणाला दिवसाकाठी १२ ते १५ किलो चिंच फोडुन होते. शिवाय घरातील अन्य व्यक्तीही मदत करतात. झाडांवर चढून बांबुने चिंचा झोडपून खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे त्या वरील टरफल बाजूला करणे, चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे करावी लागतात. चिंचेपासुन साधारणतः ५५ टक्के गर, १४ टक्के चिंचा व ११ टक्के टरफल व शिरांचे उत्पादन मिळते. चिंचेचा हंगाम दरवर्षी फेब्रुवारी ते मे दरम्यान चालतो. या ४ महिन्यात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.



दरवर्षी चिंचेचे झाड जुन -जुलै महिन्यात फुलोऱ्यात असताना त्याचा सौदा ओळखीच्या स्थानिक छोट्या व्यापाऱ्यांशी करीत असतो. ३ ते ५ हजार रुपये प्रति फुलोरा या दराने झाडांचा सौदा होतो. शेतकरी झाडे व्यापाऱ्यांना विकतात. ढगाळ वातावरण, भेसळयुक्त मालामुळे व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसतो. लिंबागणेश येथे गुरुवारी आठवडी बाजार असतो या दिवशी येथे मोठ्या प्रमाणात चिंचेची आवक होते. ५० क्विंटलच्या जवळपास खरेदी होते, माल पिवळसर पट्टीच्या दर्जाचा असेल तर सुमारे ८ हजार पासुन १० हजार रुपयापर्यंत भाव मिळतो. चिंचोक्यांना २१०० रूपये प्रति क्विंटल भाव आहे. मात्र काही ठिकाणी काळसर चिंच अथवा भेसळ याच बरोबर ढगाळ वातावरणामुळे चिंचेला आद्रतेमुळे पाणी सुटुन चिंच काळपट पडल्याने भाव कमी लागुन या मुळे व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. असे स्थानिक व्यापारी सतिश वायभट, चंद्रकांत आवसरे, शंकर पिंगळे यांनी सांगितले.

# स्थानिक नांदुरा रोडचे होत असलेले कॉँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे असल्याने स्थानिकांनी विरोध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

यााबाबत सविस्तर असे की शहरातील नांदुरा रोडचे काँग्रेस करण्याचे काम प्रगतीवर आहे काल दिनांक रात्री नऊच्या सुमारास रोडचे कॉँक्रिटीकरण सुरू असताना त्यांनी नागरिकांनी काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप करत काम बंद करा! असा पवित्रा घेतला. तेव्हा कामावर असलेल्या ठेकेदार कर्मचाऱ्याकडून नागरिकांसोबत अरेरावीची भाषा वापरल्याने संतापलेल्या नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला. झोप बसलेल्या ठेकेदार कर्मचाऱ्यांनी शहर पोलीस स्टेशन गाठले त्या पाठोपाठच स्थानिक नागरिक सुद्धा बहुसंख्येने ठाण्यात पोहोचले. सदर घटनेची माहिती पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ




यांना मिळताच ते हजर झाले व जमावाला शांत करण्यात आले. त्यादरम्यानच सार्वजनिक बांधकाम अभियंता व कर्मचारी हे सुद्धा हजर झाले. तब्बल दोन तास चाललेल्या या गदारोळात काहींच्या मध्यस्थीतून प्रकरण निवळते घेण्यात आले.कामाचा दर्जा सुधारावा या स्थानिकांच्या मागणीला सार्वजनिक बांधकाम अभियंता कडून दुसरा दिल्याने प्रकरण तूर्तास संपवण्यात आले.

**कामाचा दर्जा सुधारावा- स्थानिकांची मागणी**

रोजचे सुरू असलेले कॉँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून सदर काम इस्टिमेट नुसार व दर्जेदार करून कामाचा दर्जा सुधारावा असा सूर स्थानिकांनी लावून धरला होता. आम्ही भरलेल्या कर रूपातून मिळालेल्या निधीचा योग्य तो वापर व्हावा असेही भूमिका अनेकांकडून स्पष्ट केली गेली.

वाहतुकीच्या खोळंब्यातून एकाचा अपघात सदर सुरू असलेल्या रस्त्याच्या सुधारित करण्याच्या कामात ठेकेदाराकडून वाहतुकीच्या दृष्टिकोनातून कुठल्याही नियोजन असल्याचे दिसून येत नाही बऱ्याचदा या रस्त्यावर वाहतुकीचा कोळंबा होत असल्याचेही अनेकांकडून सांगण्यात आले आहे वाहतुकीच्या झालेल्या गोडंब्यातून गेल्या दोन-तीन दिवसांपूर्वी एकाचा अपघात होऊन त्याच्या हाताची चार बोटे फॅक्चर झाल्याबद्दलही बोलले गेले.

चोप बसलेल्या तो ठेकेदार कर्मचारी शहर पोलीस स्टेशन बसलेला

# आजेगाव येथे मुस्लिम बांधवासाठी इफ्तार पार्टी संपन्न, सौं.वैशालीताई वाघ आजेगांवकर याचा स्तुत्य उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथे पवित्र रमजान निमित्त मुस्लिम बांधवासाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

मुस्लिम समाजामध्ये रमजान हा महिना अत्यंत पवित्र मानला जातो व मुस्लिम बांधव रोजा(उपवास) हि करतात.



मुस्लिम बांधवानाचा सन्मान करण्यासाठी आजेगाव येथे सौं वैशालीताई वाघ यांच्या पुढाकारातून दरवर्षी पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने मुस्लिम बांधवासाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येथे व याही वर्षी सौं वैशालीताई वाघ आजेगांवकर यांच्या वतीने दि ०६ एप्रिल २०२४ रोजी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते व सदरील इफ्तार पार्टी मध्ये मुस्लिम बांधवासह आजेगांव येथील सर्व समाजातील नागरिक उपस्थित होते.

सौं वैशालीताई वाघ ह्या एक महिला असून सुद्धा खुप चांगले उपक्रम राबवतात त्यामुळे त्यांच्यावर सर्व स्थरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904